# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील लाल नाला व पोथरा नाला हा हिंगणघाट विभागामधून वरोरा उप विभागात स्थलांतरीत करण्याबाबत

**(१) १२३६२ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील लाल नाला व पोथरा नाला हा हिंगणघाट विभागामधून वरोरा उप विभागात स्थलांतरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१६) :**(१) होय, दि. २०.०१.२०१५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) शासन निर्णय क्र. आढावा-२०१४/प्र.क्र.३५३/२०१४ आ.(प्रशि), दि. १४.१०.२०१५ नुसार चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर अधिनस्त कार्यरत असलेल्या लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर अंतर्गतचे लभानसराड कालवे उपविभाग, वरोरा हे बांधकाम कार्यप्रकारातील उपविभागीय कार्यालय लभान सराड पोथरा लाल नाला (ल.पो.ला.) पाटबंधारे उपविभाग, वरोरा (सिंचन) या नावाने सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी रुपांतरीत खंबाडा या ३ नवीन सिंचन शाखा कार्यालयाची निर्मिती करुन, सदरहू कार्यालये चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे नियंत्रणाखाली कार्यान्वित करण्यास्तव संलग्न करण्यात आली आहेत.

पोथरा नाला प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे व लाल नाला प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापनाची कामे या उपविभागाद्वारे सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिठवली - काजरकोंड - पळसमकरवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी)**
**नवीन रस्ता करण्याबाबत**

**(२) १९६१५ (१७-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिठवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) हे गाव मौजे धोपेश्वर ग्रामपंचायत हद्दीमध्ये येत असून तिठवली काजरकोंड मार्गे पळसमकरवाडी येथे जाण्यासाठी पायवाट सोडता अन्य कोणताही मार्ग नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गालगत शासकीय फळलागवड, फळप्रक्रिया व इतर लघुउद्योग सुरु आहे परंतु रस्त्याची कायमस्वरुपी सोय नसल्याने अन्य कोणताही उद्योग सुरु करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजापूर दसूर रस्ता ते तिठवली-काजरकोंड पळसमकरवाडी हा नवीन रस्ता होण्याकरीता स्थानिक ग्रामस्थांनी सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार सदर रस्त्याकरीता किती निधीची उपलब्धता करण्यात आली आहे,

(६) तसेच सदर रस्ता तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) अशा प्रकारचे मागणीपत्र प्राप्त नाही.

(४) ते (७) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पहाणी करण्यात आली असून तिठवली काजरकोंड मार्गे ते हर्डी पळसमकरवाडी रस्ता हा योजनाबाहृय रस्ता आहे. या रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. असून त्यापैकी ०.०० ते ०.१५० कि.मी. मुरमी पृष्ठभाग व ०.१५० ते ४.०० कि.मी. अस्तित्वात नसलेली लांबी पायवाट स्वरुपात आहे. हा रस्ता करावयाचा झाल्यास प्रथम रस्ते विकास योजनेमध्ये समाविष्ठ करणे व भूसंपादनाची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. जमीन उपलब्ध झाल्यास विविध कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधी व निकषानुसार टप्प्या-टप्प्याने सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहील.

---

**गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी तालुकाअंतर्गत येणाऱ्या गावांच्या शेतजमीनीला**
**चुलबंद प्रकल्पातून पाणी देण्याबाबत**

**(३) २१५१६ (१७-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी तालुकाअंतर्गत नक्षलप्रभावित क्षेत्रातील डव्वा, भुसारीटोला, पाटेकुर्रा, रकुटोला, पळसगांव, गोपालटोली, मुंढरीटोल, चुडुरका आदी गावांतील

१०७५ हेक्टर कोरडवाहू शेतजमीनीला नजीकच्या चुलबंद प्रकल्पातून पाणी उपलब्ध करण्यासंबंधाचा प्रस्ताव शासनाच्या जलसंधारण विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मान्यता न देण्याचे कारणे काय, पर्यायी व्यवस्था म्हणून या क्षेत्रातील शेतकऱ्यांना कोणत्या योजनेतून पाणी देण्यासाठी शासनाने उपाययोजना केलेली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे

गोंदिया जिल्ह्यातील सडक / अर्जुनी तालुक्या अंतर्गत डव्वा, पळसगांव व इतर गावातील कोरडवाहू शेतीला १०७० हे. खरीप क्षेत्र सिंचन करण्याच्या दृष्टीने कामाचा समावेश करुन चुलबंद प्रकल्पाचे आधुनिकीकरणाचा रु. २५.३८ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचेकडून जलसंपदा विभागाकडे प्राप्त झाला होता.

(२) व (३) सदर प्रस्तावावर शासनाने उपस्थित केलेल्या मुद्याचे अनुपालन करुन रु. २७.७९८ कोटीचा फेर प्रस्ताव कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र दि.१/७/२०११ अन्वये अधीक्षक अभियंता, राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना पाठविण्यात आला व तद्नंतर राज्य तांत्रिक सल्लागार समितीने सदर प्रस्तावावर काही मुद्ये उपस्थित करुन प्रस्ताव अनुपालनास्तव परत केला होता. सदर प्रकरणी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुपालनासाठी लागणारा दीर्घ कालावधी लक्षात घेता चुलबंद योजनेच्या डव्वा परिसरातील कालव्याचे स्वतंत्रपणे नवीन प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करावी असे तत्कालीन केंद्रिय अवजड उद्योग मंत्री यांनी त्यांचे दिनांक ३०/१०/२०११ अन्वये कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना निवेदन दिले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने चुलबंद प्रकल्पातून डव्वा परिसरातील नवीन कालवा बांधकामाबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

---

### चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कलानंदीगड, आंबोली रामघाट-पारगड आणि तिलारी रस्ता आदिचा वन पर्यटनातून विकास करणेबाबत

**(४) ३२५४१ (२१-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कलानंदीगड, आंबोली रामघाट-पारगड आणि तिलारी रस्ता आदिचा वन पर्यटनातून विकास तसेच ऐतिहासिक सामानगडाच्या विकासासाठी निधी देण्याची मागणी मा.पर्यटन मंत्री यांचेकडे चंदगडच्या लोकप्रतिनिधीनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-०९-२०१६) :**(१) सदर प्रश्नात नमूद करण्यात आलेल्या कलानंदीगड, आंबोली रामघाट-पारगड आणि तिलारी रस्ता या तीन ठिकाणांपैकी कलानंद गड पर्यटन क्षेत्र विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.१६/१/२०१५ चे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. इतर दोन ठिकाणांसंबंधीचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) कलानंदीगडाचे उपरोक्त पत्रानुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना आवश्यक प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.

---

**पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयात मंजूर झालेल्या नवीन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(५) ३२७९१ (२९-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून रत्नागिरी जिल्हयातील काही नवीन रस्त्यांची व काही रस्त्यांच्या मजबूतीकरणाची कामे सुचिविण्यात आलेली असतानाही केंद्र शासनाकडून राज्यातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून मंजूर झालेल्या निधीपैकी एकही पैसा राज्य शासनास आजमितीस प्राप्त झालेला नसल्याचे सदर कामे प्रलंबित असल्याचे मा.केंद्रीय अवजड उद्योग मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या जिल्हा दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंतप्रधान ग्रामसडक योजनेसाठी राज्याला मंजूर झालेला निधी लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयात मंजूर झालेल्या नवीन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे विनाविलंब हाती घेवून पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्याला आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्य शासन स्तरावरुन पाठपूरावा करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पूरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरीता मा.मंत्री (ग्रामविकास) महोदया व

मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दि.१ जून, २०१५ रोजी मा.कैंद्रीय वित्त मंत्री व कैंद्रीय ग्रामविकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात येत असून मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.कैंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील PMGSY-II मधील २१ कामांकरीता आतापर्यंत १२५३.८५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धेनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**आंध्रच्या धर्तीवर नदीजोड प्रकल्प योजना राबविण्याबाबत**

**(६) ३३६२३ (२९-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंध्रप्रदेश सरकारने नदीजोड प्रकल्पांतर्गत गोदावरी नदीतील पाणी कृष्णा नदीत वळवून सोडण्यात आल्याने सदरहू राज्यातील कृष्णा आणि गुंटूर जिल्हयाप्रमाणेच रायल सीमा भागातील दुष्काळी भागात सुमारे ७ लाख हेक्टर जमिन सिंचनाखाली आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासना तर्फे दुष्काळावर मात करण्यासाठी आंध्रच्या धर्तीवर नदीजोड प्रकल्प योजना राबवून, जास्तीत जास्त जमिन सिंचनाखाली आणण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने योजना आखली असल्यास, किती हेक्टर क्षेत्र किती कालावधीत सिंचनाखाली येणार आहे व त्याकरीता किती खर्च अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-१२-२०१६)** :(१) वृत्तपत्र बातम्यानुसार १७४ किमी लांबीच्या पोलावरम कालव्याद्वारे गोदावरी नदीचे पाणी आंधप्रदेश शासनाने उपसा करुन कृष्णा नदीत सोडले आहे.

(२) वैनगंगा-नळगंगा व दमणगंगा गोदावरी या नदीजोड योजनेचा अभ्यास प्रगतीत आहे.

(३) १. वैनगंगा व नळगंगा योजनेच्या जुलै २०१५ मध्ये केलेल्या सुधारित प्रारंभिक अहवालाप्रमाणे नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा व जळगाव या जिल्हयांचे सुमारे ३,३८,५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित असून प्रकल्पाची प्राथमिक अंदाजाप्रमाणे एकूण किंमत १४,९३८.८४ कोटी आहे. या योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषण झाल्यावर सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांचे मार्फत तयार होईल. नियोजनानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल मार्च, २०१७ पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

२. दमणगंगा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात उपासा करुन वळविण्याच्या दमणगंगा-एकदरे प्रकल्पाचा पुर्व प्राथमिक अभ्यास राष्ट्रीय जल विकास अभिकरणाने केला असून त्यानुसार दमणगंगा खोऱ्यातील ५ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित

आहे. या बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल करण्याची विनंती राष्ट्रीय जल विकास अभिकरणास करण्यात आली आहे. प्राथमिक अभ्यासानुसार सन २००८-०९ चे दरसुचीचे आधारे या वळण योजनेची किंमत रु.४५९ कोटी इतकी आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्न तेरणा प्रकल्प, लातूर येथे असलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रवास भत्ते सन २०१२ पासून प्रलंबित असल्याबाबत**

**(७) ३३८०४ (२९-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न तेरणा प्रकल्प, लातूर येथे असलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रवास भत्ते सन २०१२ पासून प्रलंबित असल्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) निम्न तेरणा प्रकल्प उप विभाग अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची सप्टेंबर, २०११ ते ऑगस्ट, २०१३ या कालावधीतील रु.५२.८९ लक्ष रकमेची प्रवासभत्ता देयक अदा केली आहेत. त्यानंतरच्या कालावधीतील थकीत प्रवासभत्ता देयके निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याबाबत अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना शासन पत्र दि.२६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारदरा व मुळा पाणलोट क्षेत्रातून पश्चिम वाहिन्या (नदया) तुन कोकणात जाणारे पाणी समुद्रात वाहून जात असल्याबाबत**

**(८) ३३९४३ (२९-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारदरा व मुळा पाणलोट क्षेत्रातून पश्चिम वाहिन्या (नदया) तुन कोकणात जाणारे अडीच टीमसी पाणी समुद्रात वाहून वाया जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. मेंढीगिरी यांनी अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवालावर सरकारने आजपर्यंत काय कार्यवाही केली व पाणी वळविण्यासाठी किती खर्च येणार व सदर योजना केव्हा पूर्ण होणार ?

**श्री. गिरीष महाजन (१७-१२-२०१६)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मणचे ग्रामसेवकांनी तेराव्या वित्त आयोगाअंतर्गतच्या कामात केलेला गैरव्यवहार

**(९) ५०६१३ (२८-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मणचे ग्रामसेवकांनी तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत कोणतेही काम न करता वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर सरपंचांची खोटी सही करुन ३ लाख ६१ हजार रुपये काढल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नूसार दोषी व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-१२-२०१६)** :(१) होय. ग्रामपंचायत मणचे येथील ग्रामसेवकांनी सरपंच यांची खोटी स्वाक्षरी करुन रु.३ लक्ष, ६२ हजार रु. एवढी रक्कम काढल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय. श्री. अंकुश सिताराम काळे, कंत्राटी ग्राम सेवक यांनी १३ व्या वित्त आयोगातंर्गत रु.३ लाख ६२ हजार एवढी रक्कम वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावे काढल्याचे आढळून आले आहे. सदरहू रक्कम पुनश्च ग्रामपंचायत दप्तरी भरणा केलेली आहे.
(३) व (४) ग्रामसेवक श्री.काळे यांना दि.१६.१२.२०१५ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले होते. तसेच, दि.२७.०६.२०१६ रोजी समक्ष सुनावणीची संधी देण्यात आली होती. श्री.अंकुश सिताराम काळे, यांनी कोणताही लेखी खुलासा सादर केला नाही. त्यामुळे श्री.काळे यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन दि.२०.०८.२०१६ च्या आदेशान्वये त्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

---

**आमदार आदर्श ग्राम योजनेसाठी स्थानिक तसेच डोंगरी विकास निधीमधून निधी देण्याबाबत**

**(१०) ५४३१७ (०१-०९-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार आदर्श ग्राम योजनेतंर्गत निवडलेल्या गावांमध्ये विविध विकासकांमे मार्गी लावण्याकरीता मतदारसंघातील लोकप्रतिनिधींचे स्थानिक तसेच डोंगरी विकास निधीमधून निधी देणेबाबत मर्यादा पडत आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आमदार आदर्श ग्राम योजनेची घोषणा करताना राज्यातील लोकप्रतिनिधींने मतदारसंघातील निवडलेल्या तीन गावांचा विकास साधताना ५० टक्के निधी हा त्यांचे स्थानिक तसेच डोंगरी विकास निधीमधून खर्च करावयाचा असून उर्वरीतचा ५० टक्के निधी हा शासनाकडून देण्यात येणार असल्याचे घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील प्रत्येक लोकप्रतिनिधींने त्यांच्या मतदारसंघातील निवडलेल्या तीन गावांमध्ये आवश्यक असणारी विकास कामे करण्यास सुरुवात केली आहे परंतू यातूनही अनेक कामे प्रलंबित रहात आहेत याकरिता लोकप्रतिनिधींनी शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत जास्तीचा निधी राज्यातील प्रत्येक लोकप्रतिनिधींना द्यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) होय.

(४) शासन निर्णय दि.२० मे, २०१५ मधिल परिच्छेद क्र.२(४) येथे आमदार निधी देण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार मा. आमदार महोदय यांनी निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आमदार निधीतून घेण्यात येणाऱ्या अनुज्ञेय असलेल्या कामासाठी राज्य शासनाकडून जोडनिधी देण्यात येईल.

(५) नाही.

---

**ग्रामीण भागामध्ये साकव योजनेतंर्गत साकव पुलांची कामे करण्याकरीता निधी मिळण्याबाबत**

**(११) ५४३४९ (२९-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाचे वतीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्याच्या ग्रामीण भागामध्ये राबविण्यात येणाऱ्या सर्वसाधारण साकव योजनेतंर्गत साकव पुलांची कामे करण्याकरीता निधी अपुरा पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्हामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये सातारा जिल्हा नियोजन मंडळामार्फत या कामांना निधी कमी असल्याने सातारा जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील सर्वसाधारण साकव योजनेची कांमे हाती घेण्यात आली नव्हती त्यामुळे सातारा जिल्हातील अनेक सर्वसाधारण साकव पुलांची कांमे ही निधीअभावी अपुरी राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील डोंगरी व दुर्गम अशा ग्रामीण भागातील अनेक गांवामध्ये मागासवर्गीय तसेच दलित समाजाची वस्तीच नसल्याने या ठिकाणच्या साकव पुलांची कामे करण्याकरीता सर्वसाधारण साकव पुलांचीच कांमे घेणे क्रमप्राप्त होत असून या कामांना निधी मिळत नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वित्त व सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भात माहिती घेतली आहे काय व माहिती घेतली असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, ज्या मतदारसंघामधील अनेक गांवे व वाड्या वस्त्यांमध्ये मागासवर्गीय तसेच दलित समाजाची वस्तीच नाही अशा ग्रामीण भागामध्ये साकव योजनेतंर्गत साकव पुलांची कामे करण्याकरीता निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे तुंबाड (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे जेटीकडे पोहोचण्यासाठी रस्ता करण्याबाबत

**(१२) ५४४५८ (२६-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुंबाड (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे प्रवासी जेटी आहे परंतु या जेटीकडे पोहोचण्यासाठी रस्ता नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार जेटीकडे पोहोचण्यासाठी रस्त्या बनविण्याबाबत व रस्त्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत तत्कालीन वेळी मागणी नव्हती. तथापि, नागरिकांची गैरसोय लक्षात घेता जिल्हा परिषद रत्नागिरी यांना सदर रस्ता करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दि.१०/१०/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील बोर, धाम पोथरा, लालनाला व ओलरवणा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत

**(१३) ५४५०९ (२४-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील बोर, धाम पोथरा, लालनाला व ओलरवणा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या कालव्याचे अस्तरीकरण न केल्याने हया भागातील शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतापर्यत प्रकल्पाचे पाणी पोहचत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.
वर्धा जिल्हयातील हिंगणघाट तालुक्यातील बोर, धाम पोथरा, लालनाला व लोवरवेणा प्रकल्पाद्वारे सिंचनाचा लाभ देण्यात येतो. या प्रकल्पांच्या प्रकल्प अवालातील तरतूदीनुसार अस्तरीकरण (लाईनिंग) ची कामे करण्यात येतात व आवश्यकतेनुसार विशेष दुरुस्ती विस्तार व सुधारणा अंतर्गत देखभाल दुरुस्तीची कामे व आवश्यक निवडक ठिकाणी अस्तरीकरणाची कामे करुन प्रकल्प लाभक्षेत्रातील सर्व लाभधारकांना सिंचनाचा लाभ पुरविण्याचे शासनाचे धोरण आहे व त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील अजनसरा बॅरेज उपसा सिंचन प्रकल्प आजनसरा गावाजवळ प्रस्तावित करण्याबाबत

**(१४) ५४६१६ (२४-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील क्षेत्रामध्ये कोरडवाहू जमिन सिंचनाखाली यावी हयाकरीता अजनसरा बॅरेज उपसा सिंचन प्रकल्प वर्धा नदीवर आजनसरा गावाजवळ प्रस्तावित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास शासनाने दिनांक १३ एप्रिल, २००० रोजी सन १९९६-९७ च्या दर सुचिनुसार १५८२१.७३ लक्ष रुपयांची मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुळ प्रशासकीय मान्यतेनंतर ५ वर्षे निधी प्राप्त न झाल्याने ती व्यपगत झाली व नव्याने २०८४२.२७ लक्ष रुपये सन २०१६ ला नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली परंतु सदरहू मंजूर प्रकल्पास अद्यापपर्यंत निधी उपलब्ध करुन दिले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मंजुर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) मुळ प्रशासकीय मान्यतेनंतर ५ वर्ष निधी प्राप्त न झाल्याने ती व्यपगत झाली होती, हे खरे आहे. सन २००५-०६ चे दरसूची नुसार रु.२०८४२.२७ लक्ष किंमतीसाठी दि.२७.११.२००६ ला नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर प्रकल्पास आतापर्यंत करण्यात आलेली तरतुद व खर्चाबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | तरतुद (लक्ष) | खर्च (लक्ष) |
|---|---|---|
| २०१०-११ | २६२.०० | ०.० |
| २०११-१२ | ०.० | २३०.३९ |
| २०१२-१३ | २१.१० | ०.० |
| २०१३-१४ | २००.०० | ०.० |
| २०१४-१५ | १०.०० | ०.० |
| २०१५-१६ | १००.०० | १९१.०० |

(४) प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळसे (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) गावातील २६ क्रमांकाच्या ग्रामपंचायत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(१५) ५५११३ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळसे (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) गावातील २६ क्रमांकाच्या ग्रामपंचायत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतच्या विकासकामास शासनाने २५/१५ योजनेअंतर्गत मंजूरी देण्यात येवूनही अद्याप सदरहू रस्त्याचे विकासकाम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे विकासकाम सुरु करण्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू रस्त्याच्या बांधकामासाठी एकूण किती निधी मंजूर करण्यात आला आहे,
(३) असल्यास,सदरहू रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) होय.
(२), (३) व (४) सदर रस्त्याच्या कामासाठी रु.४.०० लक्ष निधी मंजूर असून सदर कामाची निविदा निश्चिती कार्यवाही सुरु आहे.

---

**तावरजा (जि.लातूर) मध्यम प्रकल्पाचे गेट व सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१६) ५५३५३ (२६-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तावरजा (जि.लातूर) मध्यम प्रकल्पाचे गेट व सांडवा नादुरुस्त असल्याने सदर सिंचन प्रकल्पात आपेक्षित पाणीसाठा होत नसल्याने सदर प्रकल्पाच्या गेट व सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक ४ जून,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या गेट व सांडव्याची दुरुस्ती करुन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) होय, दि. २ जून, २०१६ च्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशी मागणी केली आहे.
(२) सांडव्यातून होणारी गळती थांबविण्यासाठी सन २०११-१२ मध्ये नियमित परिरक्षण व दुरुस्ती अनुदानातून तावरजा मध्यम प्रकल्पाच्या सांडवा भिंतीची दुरुस्ती करण्यात आली आहे.

दि.२४/०६/२०१६ रोजी अधीक्षक अभियंता (बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ) अधीक्षक अभियंता (यांत्रिकी मंडळ, नांदेड) व अधीक्षक अभियंता व प्रशासक (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड) यांनी तावरजा मध्यम प्रकल्पाची संयुक्त पाहणी केली आहे. तसेच मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी देखील दि.२५/०८/२०१६ रोजी प्रकल्पाची पाहणी केलेली आहे.

या पाहणीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाच्या स्वयंचलित दरवाजांमधून होणाऱ्या गळतीसाठी उपाययोजना करण्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) ५५५६३ (१०-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण घरकुलांसाठी २ लाखांचे अनुदान शासनाकडून मिळणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामीण घरकुलांसाठी तात्काळ अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-१२-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आंतरराज्य नियंत्रण मंडळ स्थापन करण्याबाबत

**(१८) ५५६१२ (२९-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आणि तेलगंणा राज्यातील आंतर राज्य सिंचन प्रकल्पाबाबतचे सर्व नियम परस्पर सामंजस्याने घेण्यासाठी तसेच निर्णय प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आंतर राज्य नियंत्रण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र आणि तेलगंणा राज्याच्या मा.मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत दिनांक ८ मार्च, २०१६ रोजीच्या सुमारास आयोजित बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंतरराज्य नियंत्रण मंडळाची रचना व कार्यकक्षा कशाप्रकारे निश्चित करण्यात आल्या आहेत व प्रत्यक्षात हे आंतरराज्य नियंत्रण मंडळ स्थापन करण्यात आले असल्यास त्याची सध्याची रचना कशी आहे,

(३) तसेच उपरोक्त बैठकीत कोणते सामजंस्य करार करण्यात आलेले आहेत व त्यांच्या अंमलबजावणीची स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१२-२०१६) :**(१) होय.

(२) **आंतरराज्य नियंत्रण मंडळाची रचना**

१) मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र / तेलंगणा राज्य-अध्यक्ष (रोटेशन पध्दतीने दरवर्षी) (जर मा.मुख्यमंत्री अध्यक्ष नसले तर सह अध्यक्ष सभापती)

२) मा.मंत्री / राज्यमंत्री जलसंपदा / पाटबंधारे / लाक्षेवि महाराष्ट्र राज्य / तेलंगणा राज्य - सदस्य

३) मा.मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य / तेलंगणा राज्य - सदस्य

४) मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र / तेलंगणा राज्य - सदस्य

५) मा.मंत्री (वने) महाराष्ट्र / तेलंगणा राज्य - सदस्य

६) सदस्य - भारत सरकारचे जलसंपदा विभागाचे प्रतिनिधी

७) प्रधान सचिव - जलसंपदा / लाक्षेवि महाराष्ट्र / तेलंगणा राज्य - सदस्य

८) सचिव (वित्त) महाराष्ट्र राज्य / तेलंगणा राज्य - सदस्य

९) सचिव (महसूल) महाराष्ट्र / तेलंगणा राज्य - सदस्य

१०) सचिव (वने) महाराष्ट्र / तेलंगणा राज्य - सदस्य

११) कार्यकारी संचालक संबंधी पाटबंधारे विकास महामंडळ - महाराष्ट्र / तेलंगणा, मुख्य अभियंता पाटबंधारे - महाराष्ट्र / तेलंगणा - सदस्य

१२) संबंधित मुख्य वन संरक्षक - महाराष्ट्र / तेलंगणा - सदस्य

१३) सचिव - आंतरराज्य मंडळ - सदस्य सचिव

**आंतरराज्य नियंत्रण मंडळाची कार्यकक्षा**

१) आंतर राज्य नियंत्रण मंडळ १९७९ च्या GWDT निवाड्याने बंधनकारक ठरविलेल्या सर्व संबंधित मुद्यांबाबतच्या प्रकरणांचा तसेच महाराष्ट्र राज्य व आंध्रपदेश राज्यात झालेल्या संयुक्त जलसंपदा प्रकल्पाच्या बाबतीत झालेल्या करारनाम्यातील प्रकरणांचा ताबा घेईल व अशी प्रकरणे हाताळतील.

२) आंतर राज्य नियंत्रण मंडळ, आंतर राज्य नदी पाणी विवाद अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापन केलेल्या न्यायाधिकरणाने ज्यावर निर्णय दिलेला नाही अशा पाणी वाटप, खर्चाची वाटणी आणि लाभांची वाटणी या बाबींवर निर्णय घेईल.

३) मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील तरतुदींचे वित्तीय / तांत्रिक उल्लंघन असणाऱ्या बाबींसह प्रकल्प वेळेवर पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले निर्णय वेळीच घेईल.

४) आंतर राज्य नियंत्रण मंडळाचे सर्व निर्णय सहमतीने घेतलेले असतील आणि संबंधित राज्य शासन त्यांची अंमलबजावणी करतील.

५) आंतर राज्य नियंत्रण मंडळ कामकाज करण्याचे आणि कार्यपध्दतीबाबतचे नियम विहित करेल.

६) आंतर राज्य नियंत्रण मंडळास, स्थायी समितीची रचना व कामे बदल / सुधारणा करण्याचे अधिकार असतील.

७) जर एखाद्या धोरणात्मक बाबीबद्यलकिंवा अन्या एखाद्या बाबीवर स्थायी समितीत मतभिन्नता असेल तर अशी बाब आंतर राज्य नियंत्रण मंडळाकडे सोपविण्यात येईल.

(३) दि.०८/०३/२०१६ चे बैठकीत आंतरराज्य नियंत्रण मंडळ स्थापनेचा निर्णय घेण्यात आला मात्र इतर कोणतेही करार झालेले नाहीत. आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाचे कार्यालय हैद्राबाद येथे कार्यान्वीत झालेले आहे. आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाअंतर्गत स्थायी समिती व प्रकल्पनिहाय समन्वय समिती ची स्थापना झालेली आहे.

---

**नर्मदा नदीतून मिळालेल्या ११ टीएमसी पाण्यापैकी महाराष्ट्र शासनाने गुजरात राज्याच्या मागणीनुसार पाच टीएमसी पाणी गुजरात राज्याला देण्याबाबत**

**(१९) ५५६४२ (२९-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गुजरातमध्ये दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी नर्मदेच्या पाणी वाटपाचा करार करण्यात आला, या करारानुसार नर्मदा खोऱ्यात उपलब्ध असणाऱ्या ११ टी.एम.सी पाण्यापैकी महाराष्ट्राने गुजरात राज्याच्या मागणीनुसार ५ टी.एम.सी पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी दिनांक ७ एप्रिल व ३ जुलै, २०१५ रोजी तापी सिंचन महामंडळाच्या कार्यकारी संचालकानी हा निर्णय राज्याच्या दुष्काळी परिस्थितीसाठी गंभीर बाब असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दुष्काळी स्थिती असताना व सदर पाण्याची गरज दुष्काळग्रस्त महाराष्ट्र राज्याला असताना सदर पाणी गुजरात राज्याला देण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन क्षेत्रात सदर ११ टी.एम.सी पाणी वापरण्यासाठी व नर्मदेचे पाणी गुजरातला देण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१७) :**(१) नाही.

उक्त प्रश्नात नमूद केलेल्या करारानुसार महाराष्ट्र राज्याचे वाट्याच्या १०.९१४ अघफु पाण्यापैकी गुजरात राज्यातील तापी नदीवरील उकई जलाशयातून महाराष्ट्र सरदार सरोवर प्रकल्पाच्या विस्थापीतांसाठी ५ अघफू पाणी मिळणार असून, नर्मदा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या ५.९१४ अघफू पाणी महाराष्ट्रासाठी घेणेचे नियोजन आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी मध्यप्रदेश राज्याचा पॅटन राबविण्याबाबत**

**(२०) ५५७३२ (२४-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी मध्यप्रदेश राज्याचा पॅटन राबविण्याचा निर्णय घेण्यासाठी माहे मे, २०१६ च्या तिस-या आठवड्यात सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यप्रदेश राज्याच्या सिंचन पॅटर्नचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय व निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-१२-२०१६) :**(१) मध्ये प्रदेश शासनाने सिंचनाच्या क्षेत्रात केलेल्या कामाची माहिती करुन घेण्यासाठी बैठक आयोजित करणेत आली होती. मात्र बैठक होऊ शकली नाही.
(२) व (३) मध्य प्रदेश राज्याच्या संदर्भातील माहिती घेवून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील चुनखडी, खडीमाल ते माडीझडप रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(२१) ५५७९० (१८-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील चुनखडी फाटा ते खडीमल, खडीमल ते माडीझडप रस्त्यावरील एफडीआर निधी जिल्हा परिषद अंतर्गत सिमेंट काँक्रिट व सुरक्षा भिंतीचे काम माहे मार्च-एप्रिल मध्ये पूर्ण झाले असून ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील कामात बांधकाम विभागाच्या उपअभियंत्याने लाखों रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात दोषी असणाऱ्या अभियंत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-१२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. सदर कामाच्या दर्जाबाबत तक्रार झाल्यामुळे राज्य गुणवत्ता नियंत्रक यांना चौकशीसाठी प्रकरण सोपविले असता, त्यांनी दि.०१.०२.२०१६ रोजी प्रत्यक्ष पहाणी करुन अहवाल दिला आहे. सदर अहवालानुसार कामामध्ये सुचविण्यात आलेल्या तांत्रिक दुरुस्त्या संबंधीत कंत्राटदारामार्फत दोष दायित्व कालावधीमध्ये पूर्ण करुन घेण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर रस्ता वाहतूकीच्या दृष्टीने सुस्थितीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा, अमरावती, भातुकली व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(२२) ५५९९२ (२३-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा, अमरावती, भातुकली व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करण्यात यावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम, उद्योग व पर्यावरण राज्यमंत्री यांचेकडे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या निकषांप्रमाणे सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षाकरीता तालुक्यांकरीता निर्धारीत केलेला उद्दीष्टांनुसार मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीद्वारा रस्त्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत मजुरीत वाढ करण्याबाबत**

**(२३) ५६००६ (११-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत मजुरीत ५ रुपयांची वाढ करुन १६२ रुपयांवर १६७ रुपये केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त भागात मनरेगा अंतर्गत मजुरीत फक्त ५ रुपयांनी वाढ केल्यामुळे मजूरांमध्ये तीव्र नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार मनरेगा अंतर्गत मजुरी रुपये २५० करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-१२-२०१६) :**(१), (२) व (३) केंद्र शासन प्रत्येक वर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अकुशल मजूरीचा दर निश्चित करते, तद्नुसार सन २०१४-१५ साठी रु.१६८/- प्रतिदिन इतका अकुशल मजूरी दर निश्चित करण्यात आला होता. त्यामध्ये वाढ करून सन २०१५-१६ साठी रु. १८१/- प्रतिदिन इतका मजूरी दर निश्चित करण्यात आला. आता सन २०१६-१७ साठी रु. १९२/- प्रतिदिन इतका मजूरी दर निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १ एप्रिल, २०१६ अन्वये प्रतिदिन रु.१९२/- इतका मजूरी दर दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे.

मजूरी दरामध्ये वाढ करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चासकमान धरणाच्या (जि.पुणे) थिंगळस्थळ येथील डाव्या कालव्याची झालेली दुरवस्था**

**(२४) ५६३१३ (२९-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) येथील चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याला थिंगळस्थळ येथे कि.मी. १९ वर दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास पडझड झाल्याने लाखो लीटर पाणी वाया गेले असून चासकमान डाव्या कालव्याला यापूर्वीही अनेक वेळा फुटल्याच्या घटना घडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चासकमान डाव्या कालव्याची मोठी गळती बुजविण्याचे अंदाजपत्रक मुख्य अभियंत्यामार्फत शासनाकडे सादर होवूनही यासाठी कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाच्या डाव्या कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, तद्नुसार सदर धरणाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) होय, क्षेत्रिय स्तरावरुन पाहणी केली असता चासकमान डावा कालवा किमी १ ते १४४ मधील बांधकाम व भरावामधुन काही ठिकाणी पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) चासकमान डाव्या कालव्याच्या गळती प्रतिबंधक दुरुस्तीची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दूधगंगा नदीवरील सिध्दनेर्ली ते वंदूर दरम्यान कोल्हापूर बंधारा दुरुस्त करण्याबाबत**

**(२५) ५६८९७ (२४-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दूधगंगा नदीवरील सिध्दनेर्ली ते वंदूर दरम्यान असलेला कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याने दगडी खांब (पिलर) कमकुवत होऊन कोसळल्यामुळे औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणारे जॅकवेल धोक्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोल्हापूर बंधारा त्वरित दुरुस्त करावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा सिध्दनेर्ली वंदूर सहकारी संस्थेने बांधला असून बंधाऱ्याची देखभाल व दुरुस्ती याच संस्थेमार्फत करण्यात येते.

सिध्दनेर्ली वंदूर धरण सहकारी संस्थेस शासनाने रु.१८.६२ लक्ष अनुदान मंजूर केले असून त्यापैकी ५०% रक्कम (रु.९.३१ लक्ष) सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षामध्ये देखभाल दुरुस्तीच्या मंजूर अनुदानामधून संस्थेस अदा करण्यात आली आहे, उर्वरित ५०% रक्कम सन २०१६-१७ मधील निधी उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

### सिंधुदूर्ग जिल्हयातील किनारपट्टी भागात पाझर तलाव बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२६) ५७०४८ (२४-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील किनारपट्टी भागात क्षारयुक्त पाणी मिळत असल्याने नागरिकांना पिण्यासाठी गोड पाणी मिळावे यासाठी किनारपट्टी भागाचा सर्व्हे करुन पाझर तलाव बांधण्यासाठीचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठवावा असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी लघु पाटबंधारे विभागास माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघू पाटबंधारे विभागाने सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय व त्यास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, किती पाझर तलाव बांधण्याचे प्रस्तावित आहेत व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (०२-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्हा परिषदेतील विविध संवर्गातील १०५ पदांसाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षांमधील उत्तर पत्रिकामध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) ५७१८८ (०१-०९-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेतील विविध संवर्गातील १०५ पदांसाठी दिनांक २ ते २२ नोंव्हेंबर, २०१४ या कालावधीत घेण्यात आलेल्या लेखी परिक्षांमधील उत्तर पात्रिका औरंगाबादमध्ये पैसे घेऊन विक्री करीत असलेली टोळी दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पकडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हा परिषद भरती पेपर फुटी प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी यांना आरोपी करुन त्यांच्याविरुध्द दोषारोप दाखल करण्यास आर्थिक गुन्हे शाखेने शासनाकडे मागितलेली परवानगी शासनाने नाकारली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उत्तरपत्रिकांची पैसे घेऊन विक्री करणाऱ्या टोळीतील आरोपीवरील कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०१-२०१७) :**(१), (२) व (३) सदरची घटना दि.२/११/२०१४ रोजी निदर्शनास आली आहे.

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत भरती प्रक्रियेसंबंधित दि.२/११/२०१४ रोजी आयोजित परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेच्या उत्तर तालीका आर्थिक गुन्हेशाखा औरंगाबाद यांनी जप्त केलेल्या असून तपासाअंती १२ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आले आहे. या सर्व १२ आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच तत्कालीन जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याचे दृष्टीने मागीतलेल्या परवानगीबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

या व्यतिरिक्त दि.२२/११/२०१४ रोजी झालेल्या परिचर पदाच्या परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका केंद्रावरील समवेक्षकामार्फत केंद्राबाहेर गेल्याचे निदर्शनास आले त्यानुसार सदरहू समवेक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच संबंधित समवेक्षकास जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

दि.२/११/२०१४ व दि.२२/११/२०१४ रोजी आयोजित केलेल्या परीक्षा रद्द करुन अनुक्रमे ३० नोव्हेंबर, २०१४ व ४ जानेवारी, २०१५ रोजी फेर परीक्षा घेण्यात आल्या आहेत.

---

**सांगली जिल्ह्यातील ताकारी व टेंभु उपसा सिंचन योजनांचे वीज देयक राज्याच्या टंचाई उपाययोजना निधीतून भरण्याबाबत**

**(२८) ५७२२८ (१८-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील ताकारी व टेंभु उपसा सिंचन योजनांचे वीज बिल राज्याच्या टंचाई उपाययोजना निधीतून भरावे अशी मागणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने ताकारी व टेंभु उपसा सिंचन योजनांचे वीज देयक राज्याच्या टंचाई उपाययोजना निधीतून भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-१२-२०१६) :**(१) होय. सांगली जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी अशी मागणी केली आहे.

(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २०/१०/२०१५ नुसार विद्युत देयकात टंचाई कालावधीत ३३.५०% सुट दिलेली आहे.

विधिमंडळात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने टेंभू व ताकारी या उपसा सिंचन योजनांद्वारे चालू खरीप हंगामात शासन खर्चाने एक आवर्तन देण्याचा निर्णय झाला. या निर्णयाच्या अनुषंगाने ताकारी व टेंभू योजना सुरु करुन लाभक्षेत्रातील दुष्काळी भागात पाणी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात शहिदांचे स्मारक बांधण्याबाबत**

**(२९) ५७२९६ (२४-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील १८५ शहिदांचे स्मारक बांधण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश सांगली जिल्हा सैनिक सचिवांनी देऊन याबाबत समिती स्थापन करण्याचे आदेश माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार अद्यापही या संदर्भात समिती स्थापन करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहिदांचे स्मारक बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सांगली यांनी दिनांक २०/७/२०१५ रोजीच्या स्मारक उभारण्यासाठी जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे विनंती केली आहे.

(२) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सांगली यांचे दिनांक १४/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये, भारतीय माजी सैनिक संघ, सांगली यांना स्मारक उभारणीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत आणि स्मारक निगराणी समिती स्थापन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) व (४) सद्यस्थितीत स्मारक उभारणीचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यामुळे स्मारक उभारण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील चिखली सिंचन प्रकल्पाच्या कामाकरीता**
**निधी खर्च करुनही १८०० एकरात पाणी पोचत नसल्याबाबत**

**(३०) ५७८०५ (२०-०९-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील १८०० एकरच्या चिखली सिंचन प्रकल्पाच्या कामाकरीता ४३ कोटी रुपयाचा निधी खर्च करुनही केवळ ७०० एकरात सिंचनाचे पाणी पाहोचले असल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चिकली नाला प्रकल्पाला सन १९९३ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली असुन त्यामुळे चिखली, येनवा, मोहखेडी, कलंभा, येरला (थोटे), वंडली (सावरकर) अशा सहा गावांच्या १८०० एकरमध्ये सिंचन होणे अपेक्षीत होते परंतु प्रत्यक्षात मात्र ७०० एकर जमीन ओलीताखाली आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुषंगाने चिखली सिंचन प्रकल्पाचे पाणी १८०० एकरापर्यंत पोहचविण्यास अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०१-२०१७) :**(१) नाही.

चिखली नाला प्रकल्पाचा उपयुक्त पाणी साठ ५.३२७ दलघमी आहे. चिखली नाला प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १११२ हे. पैकी बिगर सिंचन आरक्षणामुळे झालेली सिंचन कपात ३८५ हे. क्षेत्र वगळता प्रवाही सिंचनाकरिता ७२७ हे. (सुमारे १८०० एकर) लाभक्षेत्र उपलब्ध आहे. या उर्वरित लाभक्षेत्रातील संपुर्ण क्षेत्रात पाणी पोहोचते.
(२) नरखेड व सावरगाव पाणी पुरवठा योजनेकरिता बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र कमी झाले व ७२७ हे. (सुमारे १८०० एकर) सिंचन क्षेत्र विकसीत करण्यात आले आहे.

लाभक्षेत्रामध्ये बहुसंख्येने असलेल्या विहीरीमुळे प्रकल्पाचे शिर्ष भागातील लाभधारक सिंचनाकरिता पाण्याची मागणी करीत नाही. मुख्य कालव्यामार्फत पाणी सोडल्यावर लाभक्षेत्रातील विहिरी पुनर्जिवित होवून विहिरीच्या या पाण्याचे लाभधारक सिंचन करतात.
(३) प्रकल्प उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) काही नाही. प्रकल्पाची कामे दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार नियोजन करुन पुर्ण करण्यात आली.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील नवनिर्वाचित पंचायत समितीतील विकास कामे करण्यासाठी निधी देण्याबाबत

**(३१) ५८१६९ (२३-०८-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील नवनिर्वाचित पंचायत समितीमधील नळ पाणीपुरवठा रस्ते, शौचालये, आदिंसाठी पंचायत समितीकडे निधी नसल्याने सदर पंचायत समिती अंतर्गत शहराचा विकास प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार नवनिर्वाचित पंचायत समिती अंतर्गत शहरातील विकास कामे पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्हयातील नवनिर्वाचित लोहारा व वाशी तालुका या दोन पंचायत समितीच्या अधिपत्याखालील ग्रामपंचायती नगर परिषदेमध्ये समाविष्ट झाल्याने या पंचायत समितीच्या अंतर्गत शहराच्या विकासाची बाब नगर विकास विभागाशी निगडीत आहे. त्यामुळे पंचायत समितीचा निधी नसल्यामुळे विकास कामे प्रलंबित असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या परिवारांना शिवणयंत्रणाचे वाटप करण्याबाबत**

**(३२) ५८१९८ (२४-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील दुष्काळजन्य शेतकऱ्यांच्या परिवारांना समाजकल्याण व महिला बालकल्याण विभागाच्या वतीने मोफत आधुनिक शिवणयंत्रणाचे वाटप केले जाणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या परिवारांना आतापर्यंत किती शिवणयंत्रे देण्यात आली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, सदरील योजना ही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवारांना अनुज्ञेय नसून मागासवर्गीय प्रशिक्षित महिलांसाठी आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभण व हिंगोली जिल्हयातील येलदरी, सिध्देश्वर धरणातील पाणी नांदेड जिल्हयाला देण्याबाबत**

**(३३) ५८२२८ (०१-०९-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील विष्णुपरी प्रकल्पातील पाणी मे महिनाभर पुरेल एवढेच शिल्लक असल्याने सिध्देश्वर धरणातील पाणी सोडण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी, जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयात पाणीटंचाई होऊ नये यासाठी परभणी व हिंगोली जिल्हयातील येलदरी, सिध्देश्वर धरणातून १५ दलघमी पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) मागणीनुसार दि.०७/०६/२०१६ ते दि.२४/०६/२०१६ या कालावधीत एकूण १५.०० दलघमी पाणी सिध्देश्वर धरणातून कालव्याद्वारे विष्णुपूरी प्रकल्पात सोडण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामधील विविध वर्गातील १३३ रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३४) ५८३२३ (२२-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामधील विविध वर्गातील सुमारे १३३ पदे रिक्त असून, सदर पदे तातडीने भरण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची रिक्त पदे असण्याची कारणे काय आहेत.
(३) असल्यास, रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-१२-२०१६) :**(१) पाचोरा तालुक्यातील काही जिल्हा परिषद शाळांमधील पदे रिक्त असल्याबाबत काही निवेदन प्राप्त झाली आहेत.
जळगाव जिल्ह्याअंतर्गत पाचोरा तालुक्यात जिल्हा परिषद शाळामधील उप शिक्षक संवर्गाची ५५, पदवीधर संवर्गाची १८, मुख्याध्यापक संवर्गाची १७, केंद्रप्रमुख संवर्गाची २ विस्तार अधिकारी, (शिक्षण) संवर्गाची १ अशी एकूण ९० पदे रिक्त आहेत.
(२) नवीन शिक्षक सेवकांची भरती न होणे, ग्रेडेड मुख्याध्यापक संवर्गाची बिंदुनामावली अंतिम पडताळणी न होणे, सेवानिवृत्तीमुळे केंद्रप्रमुखाची पदे रिक्त होणे इ. कारणामुळे सदरची पदे रिक्त आहेत.
(३) व (४) उपशिक्षक संवर्गाची पदे आंतरजिल्हा बदलीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तर पदवीधर/केंद्रप्रमुख संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

**जोतीबा (जि.कोल्हापूर) तीर्थक्षेत्र विकास आराखडा निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ५८५४१ (२६-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोतीबा हे कोल्हापूर जिल्ह्यातील अत्यंत प्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र असून राज्यातून तसेच आजूबाजूच्या राज्यातून दरवर्षी लाखो भाविक येथे भेट देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीर्थक्षेत्रात येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयी सुविधांसाठी जोतीबा तीर्थक्षेत्र आराखडा मंजूर करण्यात आला आहे परंतु सदर आराखडा निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक ४ जून, २०१५ अन्वये श्रीक्षेत्र जोतीबा, जि.कोल्हापूर या तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने शासनास सादर करण्यात आला आहे. सदर आराखड्यास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती व मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार सदर आराखडा उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदर आराखड्याकरीता निधीची मागणी करण्यात येत आहे.
(३) सन २०१६-१७ च्या विधानमंडळाच्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. परंतु सदर पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली नाही. तरी सन २०१७-१८ च्या विधानमंडळाच्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील रामटेक क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचन व्यवस्था व राजीव सागर प्रकल्पातून पिंडकापार येथे उपसा सिंचन योजना करण्याबाबत**

**(३६) ५८९०८ (११-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील मौजा हिवरा बाजार करवाही येथील आदिवासी बहुल क्षेत्रातील कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचन व्यवस्था करुन देणे व राजीव सागर प्रकल्पातून पिंडकापार येथे उपसा सिंचन योजना करण्याबाबतचे निवेदन मा.मंत्री जलसंपदा यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१७) :**(१) होय.

(२) मौजा हिवरा बाजार या आदिवासी बहुल क्षेत्राकरिता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचेकडून त्यांचे दिनांक २९.९.२०१५ अन्वये शासनास अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार मौजा हिवराबाजार परिसरातील ९ गावाचे एकूण १८८६ हेक्टर क्षेत्र असून जवळपास १३०० हेक्टर ते १४०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येवू शकते. परंतु सदर क्षेत्र हे बावनथडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात येते. बावनथडी प्रकल्प हा आंतरराज्यीय प्रकल्प असून विषयांकीत प्रस्तावामुळे या प्रकल्पाच्या जलनियोजनावर होणारा परिणाम व आंतरराज्य बाबीचा अभ्यास करण्याचे निर्देश अन्वेषण मंडळास देण्यात आले आहे. सविस्तर अभ्यासाअंती उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेंच जलाशय लिलाव निविदेला स्थगिती देण्याबाबत**

**(३७) ५८९१७ (११-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच जलाशय लिलाव निविदेला स्थगिती देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या केलेल्या नऊ मागण्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) होय.

(२) या प्रकरणी पेंच जलाशय ठेक्याने देण्याच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामपंचायतींना स्वायत्तता देण्याकरीता विविध विकास कामांकरीता सरळमार्गे वाटप करण्यात येणारा निधी अखर्चित राहील्याबाबत**

**(३८) ५८९४४ (०१-०९-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायतींना स्वायत्तता देण्याकरीता विविध विकास कामांकरीता सरळमार्गे वाटप करण्यात येणारा निधी अखर्चित राहील्यास या निधीचा अपहार वा गैरव्यवहार होऊ नये याकरीता हा अखर्चित निधी शासनाकडे जमा करण्याचे आदेश निर्गमित झाल्याचे दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या मंजूरी, तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया जिल्हा परीषद यंत्रणेमार्फत होत असल्याने विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अनेक विविध विकासात्मक कामांचा निधी मंजूर प्रक्रियेतील विलंबामुळे व आर्थिक वर्ष संपल्याने परत जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विलंब निधी मंजूर प्रक्रियेत विलंब लागणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

विविध योजनांचा निधी ज्या आर्थिक वर्षी प्राप्त झाला त्या आर्थिक वर्षात किंवा पुढील वर्षात खर्च करण्याची मान्यता असून ही दोन्ही आर्थिक वर्षे संपल्यावरही रक्कम अखर्चित राहिल्यास त्यास खर्च करण्याची परवानगी नसल्याने दिनांक १३ मे, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये अखर्चित रकमा भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ नुसार प्राप्त झालेला निधी पुढील आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्याची परवानगी असल्याने निधी खर्च करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग करिता प्राप्त झालेला निधी खर्च करण्यास परवानगी मिळण्याबाबत**

**(३९) ५९३३९ (२९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग (पूरहानी कार्यक्रम २०१३-१४) करिता प्राप्त झालेला निधी खर्च करण्यास परवानगी मिळण्याकरिता मा. वित्त व नियोजन मंत्री यांना दिनांक २८ मार्च,२०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१३-१४ मध्ये अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी लेखाशिर्ष ३०५४ २४१९ अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेस रु.१३४०.२६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला होता.

तथापि, न्यायालयीन प्रकरणामुळे अखर्चित राहिलेला रु.१३२४.२६ लक्ष इतका निधी दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत खर्च करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत**

**(४०) ५९३७४ (२६-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील ६२१ ग्रामपंचायतीपैकी फक्त ३१० ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे चालू असल्याचे माहे जुन, २०१६ च्या पहिल्या आठवड्यातील अहवालावरून निदर्शनास येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ३१० गावात फक्त ७९५ कामे सुरु असून त्यावर १४ हजार ते २० हजारच मजूर काम करत आहेत तसेच जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीत वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत विहिरी, शेततळे, जनावरांसाठी गोठा इत्यादी योजनांना मंजुरी देण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीत देखील ७९५ कामे व महिन्याला केवळ २० हजार मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर आहेत तर उर्वरित मागणी असलेल्या लोकांना काम उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर वैयक्तिक लाभाच्या कामांबाबत आतापर्यंत जिल्हयात किती अर्ज आले व त्यापैकी किती कामांना मंजुरी देण्यात आली,

(५) असल्यास, जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीत रोजगार हमी योजनेच्या कामांना मंजुरी देण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई करून लोकांना काम मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१२-२०१६) :**(१) व (२) खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंर्तत उस्मानाबाद जिलहयात दि.८ जून, २०१६ अखेर एकूण ६२१ ग्रामपंचायतीपैकी ३८६ ग्रामपंचायतीमध्ये विविध प्रकारची एकूण १२८२ कामे सुरु होती. सदर कामांवर एकूण २३८०८ इतके मजूर काम करीत होते. या १२८२ कामांपैकी वैयक्तिक लाभाची ९७४ कामे सुरु आहे. त्यामध्ये सिंचन विहीर, शेततळे, जनावरांचा गाठा, वैयक्तिक शौचालय बांधकाम, विहीर पुनर्भरण, घरकुल इत्यादी कामांचा समावेश आहे.

(३) मजुरांच्या मागणीप्रमाणे कामे उपलबध करुन देण्यात येत आहेत. जिल्हयात एकूण ८५४१ कामे शेल्फवर असून त्यांची मजूर क्षमता ३९,२३,२६३ इतकी आहे.

(४) उस्मानाबाद जिल्हयात वैयक्तिक लाभाच्या योजनांकरीता एकूण १२,११५ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११,४९४ कामांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे.

(५) मजुरांना योजनेच्या कामावर येण्याचे आवाहन करण्यासाठी मोबाईल व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील जल व सिंचन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे मांजरा खोऱ्याला कृष्णा खोऱ्यातून पाणी देण्याबाबत**

**(४१) ५९५१० (२६-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मांजरा खोरे हे अत्यंत पाणी तुटीचे असल्यामुळे महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने या खोऱ्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी कृष्णा खोऱ्यातून ८७ टी.एम.सी. पाणी परिवहन करण्यात यावे असा अहवाल १९९९ खंड-१, परि.३.५ मध्ये सुचविलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी अदयाप पर्यंत झाली नसल्यामुळे लातूर व उस्मानाबाद जिल्हयांत पाणी टंचाई निर्माण झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या शिफारशीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१२-२०१६) :**(१) होय खरे आहे.
मांजरा खोऱ्यातील २४६४ दलघमी (८७ टीएमसी) पाण्याची गरज कृष्णा खोऱ्यातून जास्तीचे पाणी परिवहन करुन भागविली जावू जास्तीचे पाणी परिवहन करुन भागविली जावू शकेल, असे महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने सन १९९९ मध्ये सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.
(२) कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार कृष्णा खोऱ्यातून मांजरा उपखोऱ्यात पाणी परिवहन करता येणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयाला कृष्णा खोऱ्यातून २१ टी.एम.सी.पाणी शासन निर्णयाप्रमाणे देण्याबाबत**

**(४२) ५९५१३ (२६-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात कृष्णा खो-याचा १० टक्के भाग येत असल्यामुळे त्या भागाला समन्यायी पाणी वाटप तत्वाप्रमाणे बाहेरच्या कृष्णा खो-याच्या भागातून २१ टी.एम.सी. पाणी उपलब्ध

करुन दयावे असे आदेश शासनाने दिनांक ९ ऑगस्ट, २००१ रोजी वा त्यासुमारास काढले होते परंतु अदयापपर्यंत ते पाणी अजून मराठवाडयाला मिळाले नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाच्या पाणी वाटपाच्या दिरंगाईमुळे उस्मानाबाद आणि बीड जिल्हयात पाणी टंचाई निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.

मराठवाड्यात कृष्णा खोऱ्याचा ८.३९ अक्के इतका भूभाग येतो.

कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनी जलाशयात सोडण्यात येणाऱ्या पाण्यापैकी कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासाठी २१ अ.घ.फू. पाणी तथा सीना कोळेगाव प्रकल्पाच्या खालील मुक्त पाणलोट क्षेत्रातून २.६६ अ.घ.फू. पाणी असे एकूण २३.६६ अ.घ.फू. पाणी दिनांक ७/७/२००९ च्या शासन पत्रान्वये कृष्णा खोऱ्याच्या मराठवाड्यातील भागास द्यावयाच्या पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता प्राप्त आहे. तथापि प्रथम टप्प्यात ७ अ.घ.फू. मर्यादेत कामे हाती घेण्याचे निर्देश आहेत.

(२) हे खरे नाही.

उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील पाणी टंचाई ही अपुऱ्या पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली होती.

(३) दिनांक ७/७/२००९ च्या शासन पत्रान्वये कृष्णा खोऱ्याच्या मराठवाड्यातील भागास द्यावयाच्या २३.६६ अ.घ.फू. पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेवर आधारीत कृष्णा मराठवाडा प्रकल्पाच्या रु.४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास दिनांक २७/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम पुढील ४ वर्षात पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे. यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने या योजनेस लागणारा निधी मा.राज्यपाल महोदयांचे निधी वाटपाचे सुत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाने घेतला आहे.

कृष्णा पाणी तंटा लवाद-२ चा निर्णय अधिसूचित झालेनंतर त्यातील तरतूदी अभ्यासून टप्पा-२ ची कामे हाती घेण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथून बाळ पळवून नेण्याचा केलेला प्रयत्न

**(४३) ५९७६२ (२२-०८-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथून बाळ पळवून नेण्याचा दिवसा प्रयत्न करण्यात आल्याची बाब दिनांक ७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारच्या घटना यापूर्वीही झालेल्या असून यामुळे येथील रुग्णांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्याकरीता सुरक्षा व्यवस्था वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) नाही.
(३) स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागातील प्रसुतीशास्त्र कक्षात २४ तास सुरक्षा व्यवस्था कार्यरत असून सी.सी.टी.व्ही. ची सुविधा उपलब्ध आहे.
(४) लागू नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यात प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेचे काम बंद असल्याबाबत**

**(४४) ५९७७४ (२९-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील खंडीपाडा, माळघर, वांगणी या रोडचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मागील २ वर्षापासून सूरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ पासून सुरु असून या रस्त्याचे काम करण्याची मुदत १५ महिने असूनही अद्यापी रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे काम मुदत संपुनही काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर रस्त्याचे काम अंशत: झालेले असून निधीच्या उपलब्धतेअभावी कामाचा वेग मंदावला होता. तथापि, ठेकेदारास प्रलंबित देयकाचे अंशत: प्रदान केले असून सदर काम पावसाळ्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

**मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या गावात स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता व स्मशानभूमीला शेड बांधण्याबाबत**

**(४५) ५९९७४ (२३-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या गावात स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता व स्मशानभूमीला शेड बांधून देण्याची मागणी अधिक्षक अभियंता, सा. बां. वि. रत्नागिरी यांना लोकप्रतिनिधी व नागरिकांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ व १ मार्च, २०१६ रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा करुनही सदर स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व स्मशानभूमीला शेड बांधून दिवाबत्तीची सोय करुन देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यासंबंधी अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय यांनी ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत सदरहू कामाचा प्राधान्याने विचार करण्यात यावा असे लेखी आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा रत्नागिरी यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्याच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे स्मशानशेड बांधणे या कामाची निवड सन २०१६-१७ च्या निवडसुचीमध्ये करण्यात आली असून स्मशानशेडकडे जाणारा रस्ता करणे या कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या जनसुविधा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या आराखड्यामध्ये करुन नियोजन समिती मार्फत प्राप्त होणाऱ्या निधी उपलब्धतेनुसार सदर काम पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४६) ५९९९० (२२-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात सेवा देणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या सेंट्रल मार्ड ने वैद्यकीय संचालकांच्या माध्यमातून शासनाला आत्महत्याग्रस्त विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) देहजे नदीवरील मोह बुद्रुक येथील कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४७) ६००६५ (२४-०८-२०१६). अ‍ॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.पालघर) देहजे नदीवरील मोह बुद्रुक येथील गेल्या चार वर्षापासून तुटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी मा. मंत्री आदिवासी विकास तथा पालक मंत्री यांच्याकडे दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील तुटलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-१२-२०१६)** :(१) व (२) अशा प्रकारचे निवेदन आढळून येत नाही, तथापि सन २०११ च्या अतिवृष्टीमुळे बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात झाडे, बुंधे अडकुन पडल्याने विसर्गास मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाल्याने या बंधाऱ्याचे ९ पिअर्स व त्यावरील ८ स्लॅब वाहून गेले. सदर बंधाऱ्यावर स्लॅब असल्याने हातणे परिसरातील ग्रामस्थांनी मौ.आलोंडे, मोह येथे जाण्यासाठी या बंधाऱ्याचा उपयोग होत होता. बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद उप विभाग, विक्रमगड यांच्यामार्फत बंधारा दुरुस्तीचे अंदाजपत्रक विभागीय कार्यालय, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे यांनी कार्यस्थळास भेट देवून सविस्तर पाहणी केली आहे. सदर बंधाऱ्याचे आयुष्मान जवळजवळ संपुष्टात आले असून पूर्णपणे नवीन बंधारा बांधावा असे सुचविल्याने सर्वेक्षणअंती नव्याने अंदाजपत्रके बनविण्यात येत आहेत. तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता घेणेची व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील ६८ सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) ६०४३८ (२६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील प्रलंबित ६८ सिंचन प्रकल्प पूर्ण होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१७) :**(१) मराठवाड्यात सध्या ८ मोठे, ७ मध्यम आणि ४७ लघु प्रकल्प असे एकूण ६२ बांधकामाधीन प्रकल्प आहेत. यापैकी ५ प्रकल्प १) निम्न दुधना प्रकल्प २) नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प ३) नांदगाव साठवण तलाव ४) बाणेगांव लघु पाटबंधारे ५) उगीलेवाडी साठवण तलाव जून २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) निम्न दुधना प्रकल्प व नांदुर मधमेश्वर प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राज्याचा अर्थोपाय व निधी उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते तयार करण्याबाबत**

**(४९) ६०४५८ (२६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून १९६५ कि.मी.चे रस्ते करणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्ते दर्जोन्नती करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने मराठवाड्यात सन २०१५-१६ या वर्षात ५४५ कि.मी. रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. रस्त्यांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया पुर्ण होवून बहुतांश कामांना सुरुवात करण्यात आलेली आहे.

सन २०१६-१७ या वर्षात मराठवाड्यात १४१९ कि.मी. लांबीचे रस्त्यांची दर्जोन्नतीची काकमे मंजूर करण्यात येणार आहेत. त्यापैकी ५३५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांना प्रशासकिय मान्यता चालू आहे. लवकरच उर्वरीत लांबीच्या रस्तयांच्या कामांना प्रशासकिय मान्यता देवून निविदा कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(५०) ६०४६४ (२९-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजनेतील बनावट लाभार्थी म्हणून अनुदान घेणाऱ्यांवर अंकुश बसविण्याकरीता राज्य शासनाने केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी 'राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना कक्षाच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास,याबाबची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०१-२०१६) :**(१) होय.

तथापि, इंदिरा आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी "राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना" स्थापना करण्यात आली. तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेबरोबरच अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांची एकछत्री प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" ची स्थापना करण्यात आली.

(२) केंद्र शासनाने दि.१०.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये इंदिरा आवास योजनेचा निधी PFMS प्रणालीद्वारे सन २०१५-१६ पासून राज्यस्तरावरील बँक खात्यामधून लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट/सरळरित्या वितरीत करणेबाबतच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने दि.१७.४.२०१५ च्या परिपत्रकान्वये PFMS प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे. तसेच Awaassoft प्रणालीद्वारे कार्यक्रमाचे ऑनलाईन सनियंत्रण करणेत येत आहे.

(३) दि.१.४.२०१५ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.